# :: नोटीस ::

## जिल्हा / उपविभागीय प्रयोगशाळा मध्ये कंत्राटी पदभरती 2016

## लेखी परीक्षेच्या प्रवेश पत्रा बाबत

वरिष्ठ भूवैज्ञानिक, भू.स.वि.यं.परभणी कार्यालय अंतर्गत प्रयोगशाळेतील कंत्राटी पदभरती प्रक्रिये दरम्यान रसायणी, अणुजैविक तज्ञ, प्रयोगशाळा सहाय्यक, व प्रयोगशाळा मदतनीस या पदां करीता अर्ज मागविण्यात आलेले होते. त्यानुसार **दि.17/12/2016** रोजी रसायणी, अणुजैविक तज्ञ , प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा मदतनीस या पदां करीता लेखी परीक्षा घेण्याच नियोजीत असून **स्थळः जिल्हा परिषद कन्या प्रशाला , स्टेशन रोड परभणी** येथे **वेळ : दुपारी 3:00 ते 4:00** या दरम्यान घेण्यात येणार आहे. तरी ज्या उमेदवारांस प्रवेश पत्र मिळाले नाही त्यांनी दि.16/12/2016 पर्यंत वरिष्ठ भूवैज्ञानिक, भू.स.वि.यं.कार्यालय प्रशासकीय ईमारत , शिवाजी नगर परभणी येथून प्रत्यक्ष येवून प्रवेश पत्र घेवून जावेत याची संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सदस्य सचिव तथा**
**वरिष्ठ भूवैज्ञानिक,**
**भू.स.वि.यं.परभणी**

## उमेदवारांना सूचना

1. सदर प्रवेश पत्राद्वारे उमेदवारांनी भरलेल्या अर्जावरुन त्यांना निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात प्रवेश देण्यात येत आहे. अंतिम निवडकरतांना अर्जात नमूद करण्यात आलेल्या प्रमाणपत्रात तफावत आढळल्यास सदर निवड रद्द करण्यात येईल.
2. प्रवेशपत्रामध्ये आपले नांव, पत्ता व इतर बाबींची माहित आहे.
3. उमेदवारांनी त्यांच्या प्रवेशपत्रावर फोटो लावून स्वतःची स्वाक्षरी करावी.
4. उमेदवारांनी परीक्षेस येताना आपल्या कडील फोटो असलेले ओळखपत्र (वोटर आय.डी.,पॅन कार्ड, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लाईसन्स इत्यादीपैकी कुठलीही एक) आणावे. परिक्षेच्या वेळेस यावरुन आपली शहानिशा केली जाईल. उमेदवाराची ओळख खोटी आढळल्यास त्यास परिक्षा प्रतिबंध केला जाऊन त्यावर फौजदारी गुन्हा नोंदविण्यात येईल.
5. आवेदनपत्रात नमूद केलेल्या अभिलेख्यावरुन अंतिम निवड होणार असून त्यात नव्याने दिलेल्या अभिलेख्यांचा समावेश करण्यात येणार नाही.
6. परिक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा सूरु असतांना धुम्रपान, गुटखा, सुपारी व इतर तंबाखूजन्य पदार्थ सेवनास सक्त मनाई राहील. असे आढळून आल्यास परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.
7. प्रवेशपत्रावर उत्तर पत्रिकेचा अनुक्रमांक दिलेल्या चौकटीत लिहिने अनिवार्य आहे.
8. उत्तरपत्रिकेची हाताळणी काळजीपूर्वक करावी.
   अ) उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी काळ्या बॉलपेनचाच वापर करावा.
   ब) उत्तरपत्रिकेमध्ये प्रत्येक प्रश्नक्रमांकानुसार 4 पर्यायी उत्तरे दिलेली आहेत, त्यापैकी जे उत्तर बरोबर आहे, त्या एकाच वर्तुळाला बॉल पेनने पुर्ण गडद करावयाचे आहे.
   क) जर एकापेक्षा अधिक पर्याय गडद (अर्धवट / पूर्ण) केले तर ते उत्तर चुक समजण्यात येवून त्याचे गुण मिळणार नाही.
9. परीक्षा हॉलमध्ये नोट्स / पुस्तके / भ्रमणध्वनी / गणकयंत्र / पेजर / संगणक इ. साहित्य वापर करण्यास सक्त मनाई आहे.
12. परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या वेळेपूर्वी 30 मिनीटे अगोदर उपस्थित राहावे व आपले बैठक क्रमांकावर स्थानापन्न व्हावे.
13. परीक्षा हॉलमध्ये गैरवर्तन केल्यास अपात्र ठरविण्यात येईल.
14. परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्र सोबत ठेवणे अनिवार्य आहे. अन्यथा परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही.
15. परीक्षा संपल्यानंतर उत्तर पत्रिका व प्रश्न पत्रिका परत करावी.
16. रसायनी/अणुजैविक तज्ञ/प्रयोगशाळा सहाय्यक / प्रयोगशाळा मदतनीस पदासाठी दि.17/12/2016 रोजी दूपारी 3.00 ते 04.00 कालावधीत परीक्षा घेण्यात येईल.
17. सदर प्रश्नपुस्तिका वस्तूनिष्ठ स्वरुपाची (बहूपर्यायी उत्तरे असलेली) असून लेखी परीक्षेचा दर्जा प्रयोगशाळा सहाय्यक / प्रयोगशाळा मदतनीस पदासाठी महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता 10 वी व 12 वी) च्या दर्जाच्या समान राहील व रसायनी/अणुजैविक तज्ञ पदासाठी पदवी तसेच पदव्युत्तर पदवीचा त्या पदासाठीचा विषयाच्या दर्जाच्या समान राहील, लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, अंकगणित, व सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी, संगणकीय ज्ञान, चालू घडामोडी या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी 01 गुण ठेवून एकुण 50 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.
18. परीक्षा संपल्या नंतर ओळखपत्राच्या शेवटचा भाग उमदेवारांनी स्वतः कडे ठेवून उर्वरीत भाग समवेक्षका / पर्यवेक्षका कडे जमा करावा.

वरिष्ठ भूवैज्ञानिक
भू.स.वि.यं.परभणी